# आमची मातृसंस्था

# श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था, कोल्हापूर

एकोणीसाव्या शतकात भारतात राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात या शतकात महत्वपूर्ण बदल घडून झाले. इंग्रजी शिक्षणाची सुरुवात हा यातील महत्वाचा दुवा होता. भारतीयांना आपल्या जीवनातील सर्वांगीण उणिवा लक्षात येण्यास सुरवात झाली होती. त्यातूनच अनेक धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळी उदयास आल्या. महाराष्ट्रामध्ये या काळात अनेक समाजसुधारकांनी उल्लेखनीय कार्य आहे. महाराष्ट्राच्या समाजसुधारनेच्या इतिहासातील अग्रगण्य व्यक्ती म्हणजे राजर्षी शाहू छत्रपती महाराज. राजर्षी शाहू छत्रपती महाराजांची कारकीर्द कोल्हापूर संस्थानच नव्हे तर महाराष्ट्राच्या इतिहासाला कलाटणी देणारी होती. आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक पुनर्घटनेचे शिल्पकार म्हणून राजर्षि शाहू महाराजांचे नाव एकमुखाने येते. महात्मा फुलेंचे अपूरे कार्य राजर्षि शाहू महाराजांनी पुढे नेण्याचे महत कार्य केले. आपल्या कारकीर्दीत वेदोक्त चळवळ,अस्पृश्यता निवारण, मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण, विदयार्थी वसतिगृहांची चळवळ, अस्पृश्योद्धार, स्त्रीशिक्षण, आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन, संगीतापासून मल्लविद्येपर्यंत निरनिराळया कलांना प्रोत्साहन, शेती उत्पादनासाठी पाटबंधारे, सहकारी संस्थाना उत्तेजन, कामगारांना संघटना उभारण्यास चालना दिली, मागासवर्गीयांना नोकरीत ५० टक्के राखीव जागा, वेठबिगार पद्धत बंद केली. राजर्षि शाहू महाराजांनी केलेल्या विविधांगी सुधारणांमुळे कोल्हापूचा नाव लौकिक वाढला. राजर्षि शाहू महाराजांनी शैक्षणिक सुधारणांना विशेष प्राधान्य दिले. सामाजिक बदलासाठी संस्थानातील प्रजा सुशिक्षित असणे गरजेचे असल्याने विविध स्वरुपाच्या शिक्षणसंस्थांची स्थापना, विद्यार्थ्यांना सवलती आणि कोल्हापूरमध्ये विद्यार्थी वसतिगृहे सुरू करण्याला प्राध्यान दिले. महाराष्ट्रामध्ये वसतिगृहांची चळवळ श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांची प्रेरणा व उदार दातृत्त्वातून सुरू झाली. शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या उद्धारासाठी जे अनेक प्रयत्न केले, त्यामधील विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे त्यांनी केलेल्या शैक्षणिक सुधारणा होय. बहुजन समाजातील लोकांना शिक्षणाची दारे उघडी केल्याशिवाय त्यांची प्रगती होणार नाही यावर त्यांचा ठाम विश्वास होता. तत्कालीन परिस्थितीचा विचार करता मुलांच्या राहण्याची व्यवस्था राजाराम कॉलेजच्या वसतिगृहाव्यतिरिक्त फाशी कोठे नव्हती. जी होती ती उच्चवर्णियांपुरती मर्यादित से इतरांना त्यामध्ये प्रवेश नव्हता. त्यामुळे त्यांनी विवि धर्माच्या मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी या उद्देशाने वसतिगृहे स्थान करण्याचा निर्णय घेऊन कोल्हापूरात वसतिगृहे सुरू केली.

**सर्व जाती-धर्मातील विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाचा प्रयोग :**

मराठा विद्यार्थ्यासाठी वसतिगृह स्थापन करण्यास तात्कालीक असे जे कारण घडले ते फार मनोरंजक आहे. कोल्हापुरांत याच काळांत ब्राम्हण विद्यार्थ्यासाठी चालविणेत आलेले एक वसतिगृह होते. या वसतिगृहांत ब्राम्हणेतर विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्यांत आला. वास्तविक पाहता १८९६ सालाच्या सुमारास स्थापन झालेल्या या वसतिगृहाची जाहिरात 'सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांचे वसतिगृह' अशी करण्यात आली होती. आपल्या प्रजाजनाच्या सर्वांगिण उन्नतीसाठी झटणाऱ्या राजर्षि शाहू छत्रपती महाराजांनी या संस्थेला उदार अंत:करणाने मोठी मदत दिली. कारण राष्ट्रीय शिक्षण बिरुद या संस्थेच्या शिरोभागी होते, या संस्थेच्या माध्यमातून सार्वत्रिक शिक्षण प्रसार अशी महाराजांची इच्छा होती. महाराजांनी केलेल्या मदतीबद्दल 'राष्ट्रीय शिक्षणा' चे प्रवर्तक म्हणवून घेणारे प्रा. विजापूरकर यांनी पुढील मजकूर आपल्या 'समर्थ' या पत्रात लिहिला आहे. "आमचे दयाळू व प्रेमळ प्रभू श्री शाहू छत्रपति महाराज अशारितीने शिक्षणाच्या कामी जे लोक परिश्रम करतील त्यांस सहाय्य करण्यास सिद्ध असतात, यविषयी आम्हांस शंका वाटत नाही." परंतु 'खावयाचे दात एक आणि दाखवावयाचे दात' एक असा हा प्रकार असल्याचा अनुभव राष्ट्रीय शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या ब्राम्हणेतर तरुणांना या संस्थेत प्रवेश नाकरण्यात आला. पुढे महाराजांनी हा प्रयोग बंद केला व सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्यांचासाठी स्वतंत्र वसतिगृह स्थापन करण्याचा निर्णय घेतला. प्रस्तुतच्या वसतिगृहाची स्थापना होण्यापूर्वी ब्राम्हणेतर समाजांतील हाताच्या बोटावर मोजण्या इतक्याच तरुणांना इंग्रजी शिक्षणाचा लाभ घडला होता. अशा विद्यार्थ्यांत श्री. खंडेराव बागल, श्री यशवंतराव दिलवर, रामचंद्रराव जाधव, तुकाराम पाटील, गोविंदराव सासने, बळीवा पाटील ही नांवे प्रमुख

होती. यांनी मॅट्रीकच्या परिक्षेत उत्तम प्रकारे यश मिळवून त्यापैकी काहींनी कॉलेजच्या शिक्षणास प्रारंभ केला होता.

**संस्थेचे बिजारोपण :**

राजर्षि शाहू महाराजांनी वसतिगृह सुरू करण्यापूर्वी न्या. एम. जी. रानडे व गोपाळ कृष्ण गोखले यांच्याशी यासंदर्भात चर्चा केली,त्यांना महाराजांची योजना आवडली. पुण्याचे डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटीचे प्रमुख गंगारामभाऊ मस्के यांचाही याबाबतीत सल्ला मसलत केलेली होती. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणायचं असेल तर त्यांची जाती निहाय वसतिगृह निर्माण करणे गरजेचे असल्याचे महाराजांच्या निदर्शनास आलेले होते. कारण त्याकाळातील समाजात असलेली जातीय कट्टरता सहजासहजी मोडून काढली जाऊ शकणारी गोष्ट नव्हती. प्रत्येक जातीतील विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या त्यांच्या जातीची वसतिगृह निर्माण करणे आणि त्यांच्या जातीतील पुढाऱ्यांना पुढे आणणे हे महाराजांना योग्य वाटत होते. याशिवाय त्यांनी मुंबई इलाख्याचे शिक्षण संचालक मि. गाईल्स यांच्याशीही याबाबतीत पत्रव्यवहार केला होता. मि. गाईल्स १० ऑगस्ट १९०० रोजी महाराजांना लिहिलेल्या पत्रात म्हणतात, 'महाराजांचे पत्र आल्यामुळे मला परमानंद झाला आहे मराठयांकरता जेवणाखाण्याची सोय असलेल्या शाळेच्या प्रश्नावर आपल्याशी चर्चा करायला मला आनंदच होईल. शिक्षणाच्या दृष्टीने मराठयांना पुढे आणण्यासाठी असे विशेष प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे. हया बाबतीत मी आपल्याशी सहमत आहे. मराठयांच्या सवयी आणि भावना या उच्च शिक्षण घेण्याच्या बाबतीत प्रतिकूल आहेत. यास्तव ब्राह्मणांशी तुलना करता ते शिक्षणात बरेच मागे पडलेले आहेत. मी जेव्हा कोल्हापूरला भेट दिली तेव्हा मला असे आढळून आले की, शिक्षण खात्यात नोकरीसाठी येणा-या अर्जात मराठयांचे अर्ज क्वचित आढळतात. इतर खात्यातही तीच परिस्थिती आहे"

पुणे येथे स्थापन झालेल्या डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक गंगाराम भाऊ म्हस्के यांच्या मदतीने व माहितीने त्यांनी कै. भास्करराव जाधव,दाजीसाहेब विचारे व जिवाजीराव सावंत या तीन पदवीधर मराठ्यांना कोल्हापुरात बोलावून घेतले. आणि त्यांच्यावरच श्री शाहू मराठा बोर्डिंग या संस्थेची जबाबदारी प्रामुख्याने सोपविली. राजर्षी शाहू महाराजांच्या मनामध्ये सन १८९४-९५ पासून श्री मराठा विद्यार्थी वसतिगृहाचे बीजारोपण करण्याचा विचार होता. कारण मराठाआधी बहुजन समाजातील मुलांना विद्येचा लाभ व्हावा यासाठी शाहू महाराजांनी अंतकरण पूर्वक तळमळ होती बहुजन समाजातील गरजू आणि भोजपुर विद्यार्थ्यांच्या शोधात शाहू महाराज सतत असत पुण्यातील डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटी सोडली तर बहुजन समाजासाठी शैक्षणिक कार्य करणारी दुसरी संस्था महाराष्ट्रात नव्हती.

सन १८९९ मध्ये शाहू महाराजांना वर्तमानपत्रातून वडगावचा पांडुरंग चिमणाजी पाटील हा राजाराम हायस्कूलचा विद्यार्थी मॅट्रिक पास झाल्याची बातमी समजली. शाहू महाराजांना या बातमीने खूप आनंद झाला. त्या काळात बहुजन समाजातील एक मुलगा शिकणे, मॅट्रिक पास होणे ही खूप मोठी कौतुकाणी गोष्ट होती. शाहू महाराजांचा मुक्काम त्यावेळी प्लेगच्या साथीमुळे पन्हाळगडावर होता. महाराजांनी लगेचच स्वार पाठवून पाटलाच्या मुलास पन्हाळयावर बोलावून घेऊन त्यांच्या पुढील शिक्षणांची आपुलकीने विचारपूस केली. पाटील घराण्यातील एका शेतकरी मुलाने मॅट्रीकच्या परिक्षेत सुयश संपादन करावे, ही मोठ्या कौतुकाचीच गोष्ट होती. डॉ. पाटील यांनी त्या वेळच्या ब्राम्हणी खाणावळीतील स्वतःचे कटु अनुभव आणि परगांवच्या विद्यार्थ्यांचे होणारे हाल महाराजांना सांगताच वसतिगृहाची कल्पना मूर्त स्वरू पांत आणण्याचा निश्चय केला. याचवेळी महाराजांच्या जवळ शिक्षणासाठी म्हणून जी मुले राहिली होती, त्यांत शंकरराव इंदुलकर,बाळासाहेब खानविलकर,नानासाहेब गायकवाड, भाऊसाहेब गायकवाड, हिंदुराव घाटगे, गोविंदराव पिसाळ, आळवेकर, शिंदे व बाबासाहेब निंबाळकर ही मंडळी होती. या सुमारास मॅट्रिकच्या परिक्षेत यशस्वी झालेले सातारचे रावबहादूर पी. के. शिंदे, आर. आर. पोवार, जाधव या मंडळीना बोलावून आणले. यापैकीं रावबहादूर पी. के. शिंदे हे गुरुवर्य गोविंदराव सासने यांच्यामार्फत रावबहादूर दाजीराव विचारे यांना भेटले आणि स्वतःच्या शिक्षणांची कोल्हापुरांत कांहीं सोय होईल किंवा काय याची चौकशी केली. रावबहादूर विचारे यांनी महाराजांच्या सल्ल्याने त्यांची शिक्षणाची सोय होईल असे आश्वासन तर दिलेच. आणि आणखी काही विद्यार्थी येतील काय याची चौकशी केली. यावरुन होतकरु

विद्यार्थ्यांना बहुजन समाजांत शिक्षणप्रसार व्हावा याद्दृष्टीने शैक्षणीक सवलती देण्यास महाराज किती उत्सुक होते याची कल्पना येईल. अशा प्रकारे विद्यार्थी जमल्यानंतर १८ एप्रिल १९०१ रोजी सध्याच्या 'श्री शाहू छत्रपति मराठा विद्यार्थी वसतिगृहा' ची मुहूर्तमेढ रोवली. शाहू महाराजांच्या वडिलांना इंग्लंडची महाराणी व्हिक्टोरियाने आपल्या दरबारी आदरातिथ्यपूर्वक सन्मान व शाहू महाराजांना 'महाराजा' पदवी दिलेली होती. राणीच्या काळात बहुजन समाजाला शिक्षणाची दारे खुली झाली म्हणून या वसतिगृहास व्हिक्टोरिया राणीचे नाव दिले. हे वसतिगृह 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डींग हाऊस' या नावाने सध्याच्या पद्माराजे मॅटर्निटी होम समोर सत्यवादी भवनाच्या शेजारच्या मोकळ्या जागेत जो एक बंगला होता तेथे सुरु करण्यात आले होते, त्यावेळी हा बंगला त्यावेळी फॉरेस्ट खात्याच्या ताब्यात होता.

**श्री शाहू मराठा विद्यार्थी वसतिगृह स्थापणेसाठी भरलेली पहिली सभा :**

बहुजन समाजातील मुलांच्या राहण्याची आणि शिक्षणाची कायम स्वरूपी सोय व्हावी यासाठी काही तरी ठोस उपाययोजना करण्यासंबंधी कै. भास्करराव जाधव, कै. दाजीराव विजारे, कै. जिवाजीराव सावंत यांना तीन मराठा तरुणांना शाहू महाराजांनी खास वाड्यावर बोलावून सूचना दिली होती. शाहू महाराजांच्या आदेशानुसार यांनी दि. १८ एप्रिल १९०१ रोजी श्रीमंत दत्ताजीराव घाटगे, (सर्जेराव घाटगे) यांच्या बंगल्यावर त्यांच्याच अध्यक्षतेखाली मराठा समाजांतील प्रमुख पुढाऱ्यांची सभा भरली. 'मराठा एज्युकेशन सोसायटी'या संस्थेची स्थापना करण्यांत आली. श्रीमंत मामासाहेब खानविलकर,श्रीमंत अप्पासाहेब म्हैसाळकर, श्री भास्करराव जाधव, श्री दाजीराव विचारे, श्री जीवाजीराव सावंत वगैरे मंडळीनी यांत प्रामख्याने भाग घेतला होता. या सर्वांच्या पाठीमागे राजर्षि श्रीशाहू छत्रपती महाराज यांचे प्रभावी व्यक्तिमत्व आणि प्रबळ अशी शक्ति होती म्हणूनच पुढारलेल्या वर्गाच्या विरोधातून या संस्थेचा जन्म झाला. या संबंधी जिवाजीराव सावंत संस्था स्थापण्याकरिता भरलेल्या पहिल्या सभे तील भाषणात म्हणतात, 'कोणत्याही देशाचा उत्कर्ष होण्यास त्यांत रहाणाऱ्या सर्व वर्गाच्या लोकांची सामाजिक, नैतिक व धार्मिक स्थिति ही एकाच प्रकारची असावी लागते. कोणत्याही देशांत राष्ट्र ही संज्ञा प्राप्त होण्यास त्या देशांतील लोकांचा धर्म, भाषा व ऐतिहासिक संबंध हे एक प्रकारचेच असावे लागतात. या गोष्टीशिवाय देशाभिमान कधीहि जागृत रहात नाही. या बाबतीत आमच्या देशाच्या स्थितीचा विचार केला म्हणजे मन फार उद्विग्न होते. पूर्वी कर्म व स्वभाव यावरून केलेल्या चातुवर्णा पासून सांप्रत हजारो पोट जाती निर्माण झाल्या आहेत. आर्य धर्माच्या पोटशाखा व पोटभाषा झाल्या आहेत. आज या देशांत रहाणारे लोक सर्वप्रकारच्या भिन्न, भिन्न स्थितीत आहेत. या पोटवर्गापैकी मराठा जातीची पूर्वी काय स्थिती होती व आज काय आहे याचा विचार करण्यासाठी आज सभा भरली आहे.

गेल्या तीन शतकांत महाराष्ट्रावर काय किंबहुना सर्व हिंदुस्थानावरही मराठे लोकांनी फारच उपकार केले आहेत. श्री शिवछत्रपतींच्या वेळी मराठे लोक फार चांगल्या भरभराटीस आले होते. ही गोष्ट सर्वांना माहीत आहेच. परंतु सातारच्या शाहू महाराजांच्या कारकीर्दीनंतर मराठे लोकांचे पाऊल मागे पडत चालले ते आजवर एकसारखे मागे पडत चालले आहे. त्यामुळे त्या जातीचे लोक फार निकृष्ट दशेस आले आहेत असे म्हटल्या वाचून रहावत नाही. ही निकृष्ट स्थिती सुधारण्याचा व मराठे लोकांना चांगल्या स्थितीला आणण्याचा सर्व जे कोणी समंजस व सुशिक्षित असतात त्यांच्या शिरावर आहे, असे मला वाटते. ही निकृष्ट स्थिती सुधारण्यास व लोकांना राष्ट्राचा एक महत्त्वाचा अवयव बनविण्यास पहिला सुलभ उपाय म्हटला म्हणजे या जातीतील लोकास सुशिक्षण देणे हा होय.

आमच्या लोकांत विद्येचे पाऊल फार मागे आहे. तें पाऊल पुढे सारण्यास आम्ही मनापासून खटपट केली पाहिजे. आमच्या लोकांची स्थिती गरीबीची म्हणून शेकडो हुशार व होतकरू मराठ्यांची मुले विद्येच्याकामी पुढे सरसावत नाहीत म्हणून अशा खरोखर गरीब व होतकरू अशा मुलांच्या शिक्षणासाठी आम्ही काहीतरी केले पाहिजे.

**आक्षेपण्यास म्हणजे :**

अशा प्रकारच्या संस्था कोठेहि निघाल्या म्हणजे त्यापासून जातिमस्सर वाढतो असा कित्येक लोकांकडून आक्षेप घेण्यांत येतो परंतु या आक्षेपांत काही अर्थ नाही. कोणत्याही लोकांत शिक्षणाचा प्रसार झाला तर त्या

शिक्षणापासून होणारे फायदे त्या लोकांस मिळालेच पाहिजेत व ते मिळू लागले म्हणजे त्या लोकांस आपली खरी स्थिती कळून ते इतर लोकांशी जास्त सलोख्याने वागू लागतील हे हेतू मनांत धरून प्रत्येक जातीने आपआपली स्थिती सुधारणे म्हणजे परस्पर जातीमध्ये स्नेहवृद्धि करणे व देशाचे कल्याण करण होय. हाच उद्देश मनात धरून निरनिराळ्या जातीतील लोकांनी आपापली स्थिति सुधारणेचे प्रयत्न सुरू केले आहेत. निरनिराळया जातीत विद्यावृद्धि फंड स्थापन झाले आहेत. उदाहरणार्थ कायस्थ परभु मंडळीचे बडोदे व ठाणे येथील विद्यावृद्धि फंड,कुडाळ देशस्त गौडब्राम्हण मंडळीचा बडोदे येथील विद्यावृद्धि फंड, मुसलमान लोकांसाठी मुंबईत निघालेली अंजुमान-इ-इस्लाम नांवाची संस्था, खानबहादुर काजी शहा बुद्दीन यांनी विद्येच्या कामी सरकारास दिलेली एक लाख रुपयांची देणगी दिली.

कोणत्याहि देशाच्या कल्याणास शिक्षणाची जरुरी किती आहे ही गोष्ट युरोप खंड व हिंदुस्थान देश यांतील शिक्षणपद्धतीचा विचार केला म्हणजे कळून येईल. युरोपांतील इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी वगैरे राष्ट्रांतील सर्व प्रजेस निदान प्राथमिक शिक्षण तरी सक्तीचे देण्यात येते. गरीब लोकांचे मुलास सरकारच्या खर्चाने शिक्षण दिले जाते. या देशांतील गिरणीतील मजूरही  वर्तमानपत्रे वाचतात! मी युरोपखंडात असतांना अशा मजुरास वर्तमानपत्रे वाचतांना पाहिले म्हणजे हिंदु स्थानांत अशी स्थिति आली म्हणजे हिंदुस्थान देश राष्ट्रपदास पोचेल असे विचार माझ्या मनांत घोळत असत.

मराठा जातीत शिक्षणवृद्धि व्हावी, काही उपाय करावेत असे विचार रा. सा. बाळासो गायकवाड, विचारे वगैरे मंडळींच्या मनांत बरेच दिवसापासून घोळत होते. त्याला श्री. बापूसो घाटगे, श्री. बाबासो खानविलकर वगैरे मंडळीचे अनुमोदन मिळाले. त्यावरून कोल्हापूर येथे मराठा मंडळींत प्रसार करणारी अशी एक संस्था काढावी असा मंडळींचा विचार ठरला, म्हणून अशी संस्था येथे स्थापन व्हावी अशी मी सूचना करत आहे. या संस्थेचे नांव मराठा एज्युकेशन सोसायटी” असे असावे. या सोसायटीने प्रारंभी मराठ्यासाठी बोर्डींग हाऊस स्थापावे अशी ही सूचना मी करितो. या बोर्डींगचे नांव “व्हिक्टोरिया मराठा स्टूडन्टस् इन्स्टीटयूशन” हे नांव द्यावे.

ही संस्था चांगली चालविणे म्हणजे मराठा जातीचे सर्व प्रकारचे कल्याण करणे होय. श्री छत्रपती महाराज यांचा सर्व जातीमध्ये विद्याप्रसार करवून परस्पर स्नेह व प्रीति वाढविण्याचा हेतू पाहूनच आमच्याकडून चळवळ व खटपट होण्यास आमच्या बुद्धीस प्रेरणा झाली हे सांगण्यास मला फार आनंद वाटतो. या श्री महाराज सरकारांच्या हेतुबद्दल मीच काय पण महाराष्ट्रांत किबहुना सर्व हिंदुस्थानात कोठेही राहाणारा व मराठ्याचे रक्त अंगांत खेळत असणारा मनुष्य श्रीमंत महाराज सरकारांचा फारफार आभारी होईल. आपल्यास वरील केलेल्या सूचनेस श्री महाराज सरकार यांजकडून अनुमती मिळेल अशी मला पूर्ण आशा आहे. अशा प्रकारचा श्रीमंत महाराज सरकारांच्या उपकाराबद्दल आर्यभूमीवर वसत असलेले व आज गरीबदशेस आलेले मराठे लोक ही मदत प्रत्यक्ष श्री शिव छत्रपतींच्या वंशजापासून आलेली आहे हे पाहून आनंदीत होतील. मराठे लोकांना चांगली स्थिती यावी असे ज्यांना मनापासून वाटत असेल मग ते कोणत्याही जातीचे किंवा राष्ट्राचे लोक असोत त्यांनीही या सोसयटीस मदत करावी. अशाप्रकारे मदत करणाऱ्या सर्व लोकांचे मराठा मंडळीवर फार उपकार होणार आहेत. विद्यावृद्धि करण्याच्या कामी मदत करणे सर्वथैव पुण्य आहे. ज्या वेळी पुण्यात डेक्कन एज्यूकेशन सोसायटीची स्थापना झाली त्यावेळी श्री. आबासाहेब घाडगे यांनी किती अविश्रांत परिश्रम केले व ते ती संस्था चिरायू करण्यास झटले ही गोष्ट आठवूनच मराठेत्तर जातीच्या लोकांनी आपल्या संस्थेस मदत करण्याच्या कामी श्रीमंताचा कित्ता गिरवावा अशी मी विनंती करतो. अशा प्रकारे मराठा समाजाचा सुधारणा रुपी सूर्य आज क्षितिजावर उदयाला येत आहे त्याच्या आड केव्हांतरी ढगही येतील तरी सुधारणारुपी सूर्य ती नाहीशी करून नेहमी प्रकाशमान होईल व तो भरमध्यान्ही येऊन तेथेंच सतत राहून आमच्या समाजास सुशिक्षणाने सुशोभित ठेवील अशी पूर्ण आशा बाळगून तसेंच आज निर्माण होणारी ही आमची संस्था चिरायू व्हावी म्हणून परमेश्वरा पाशी मनोभावाने प्रार्थना करून मी आपले भाषण संपवितो.’

**संस्था स्थापनेच्या बैठकीमध्ये झालेली मान्यवरांची चर्चा :**

श्री शाहू मराठा विद्यार्थी वसतिगृह अर्थात श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था स्थापन करण्याकरिता दि. १८ एप्रिल १९०१ रोजी पहिली सभा संपन्न झाली या सभेमध्ये कोल्हापूर संस्थान व आसपासच्या भागातील

अनेक मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी विविध मान्यवरांनी या आपली मते मंडली आणि विस्तृत आणि उद्‌बोधक चर्चा झाली. या मध्ये प्रथम श्री. जिवाजी सावंत यांचे भाषण झाल्यावर श्री आबासाहेब हिम्मतबहादर यांनी “मराठा एज्यूकेशन सोसायटी” स्थापन करण्याची सूचना मांडली. श्री. आबासाहेब हिम्मतबहादर यांच्या सूचनेला श्री. दाजीबा विचारे यांनी अनुमोदन दिले. श्री. अप्पासाहेब सरलष्कर यांनी या सोसायटीतर्फे “बोर्डिंग हाऊस” सुरू करावे अशी सूचना मांडली व श्री. बाबासाहेब खानविलकर यांनी याला अनुमोदन दिले. श्री. पंडितराव सरन्यायाधीश हे या पाहुणे म्हणून हजर होते त्यांनी अशी प्रतिसूचना केली की, बोर्डिंग हाऊस न काढता मराठी मुलाना शिष्यवृत्त्या ध्याव्यात. श्री. विनायकराव सोहनी मुन्सफ यांनी असा एक खोचक प्रश्न विचारला की,या संस्थेसाठी जमणारा फंड तरी किती आहे. श्री. सावंत यांनी मराठा समाजाकरितां बोर्डिंग हाऊस स्थापन करण्यासंबंधीचे आपले विचार मांडून या बोर्डिंगात येणाऱ्या विद्यार्थ्यास त्यांचा ऐपतीपेक्षा शिक्षणाकरितां जेवढा अधिक खर्च येईल तेवढाच या संस्थेकडून शक्यतोवर देण्याचा विचार आहे. म्हणजे हे बोडिंग काटकसरीने चालविण्यात येईल असे सांगितले. यावर श्री. सोहनी यांना गप्प बसावे लागले. सर रघुनाथराव सबनीस यांनी असे सांगितले की, बोर्डिंग स्थापण्यापासून परस्पर दळणवळण वाढून अभ्यासाची ईर्षा उत्पन्न होते. तेव्हां ते स्थापण्याची जी कल्पना काढली आहे ती चांगली आहे. श्री. पंडितराव यांची प्रतिसूचना बारगळल्यामुळे मूळ सूचना पास होऊन बोडिगला व्हिक्टोरिया राणीचे नाव देण्याचे सर्वानुमते ठरले. शेवटी श्री. भास्करराव जाधव यांनी नियम वाचून दाखविल्यावर सभेचे काम संपले.

**संस्थेच्या पायाभरणी समारंभातील कर्नल सिली यांचे भाषण :**

श्री शाहू मराठा विद्यार्थी वसतिगृहाची पायाभरणी समारंभ राजर्षि शाहू छत्रपती महाराजांच्या उपस्थितीत संपन्न झाला. श्री शाहू मराठा विद्यार्थी वसतिगृहाची कायम स्वरूपाची इमारत असावी यासाठी दसरा चौकातील मोठी जागा वसतिगृहाला देऊ केली व दि. २५ सप्टेंबर १९०१ रोजी कर्नल सी. डब्ल्यू. एच. सिलि, पोलिटिकल एजंट कोल्हापूर संस्थान यांच्या हस्ते वसतिगृहाची पायाभरणी केली याप्रसंगी कर्नल सिली यांनी उद्‌घाटनपर भाषण केले. या प्रसंगी झालेल्या भाषणात ते म्हणाले की, “मराठा जातीचे कल्याण करणाऱ्या अशा संस्थेशी आपला संबंध जडला ही मोठया आनंदाची गोष्ट आहे. विधेपासून एकंदर समाजास मोठे फायदे आहेत. नुसत्या शाळा स्थापन झाल्या म्हणजे शिक्षणाची सोय होते असे नाही. तर बाहेर गांवाहून येथे येणाऱ्या विद्यार्थ्यांची व्यवस्था लावणाऱ्या या सारख्या संस्थाची फार जरुरी आहे. जसजसे आपल्या संस्थेपासून लोकांस फायदे दिसून येतील तसतसें जास्त मराठे गृहस्थ या संस्थेस मदत करतील अशी मला उमेद आहे. कोल्हापूर वर्णनाच्या एका पुस्तकामध्ये मराठे लोकांविषयी पुढील प्रमाणे माहिती दिली आहे. ‘मराठे लोक हे साधे, मनाचे मोकळे, स्वावलंबी, उदार, सभ्य व चांगल्या रितीने वर्तन करणाऱ्याशी विश्वासाने वागणारे असे आहेत. यांचा डौल सर्व प्रसिद्धच आहे. शिपाईगिरी हा आपला धंदा असें ते समजात. खाऊन पिऊन सुखी अशा मराठयांच्या घरी एक ब्राम्हण कारकून असतो त्यास दिवाणजी अशी संज्ञा असते. दिवाणजी आपल्या धन्याला फसविण्यासाठी त्याच्या अडाणीपणाचा बहुधा फायदा घेतो आणि कधी कधी तर तो त्याला आपला देणेदार बनवितो.’ हे खरे असेल तर मोठी विचार करण्याजोगी गोष्ट आहे. थोडक्यात खर्चात अभ्यासासाठी जेवणाची व रहाण्याची सोय करावी, एवढाच या कमिटीचा उद्देश नसावा. तर नैतिक व धार्मिक उन्नत्तीकडेही लक्ष दिले पाहिजे. ज्याप्रमाणे आम्ही इंग्लीश लोक आल्फ्रेड दी ग्रेट यांचा सहस्त्र वार्षिक उत्सव करण्याच्या विचारांत सध्या आहोत त्याप्रमाणे मराठे लोकांनी त्यांचा राष्ट्रीय वीर शिवाजी यांच्याविषयींचा अभिमान बाळगला पाहिजे. त्यांचे उदात्त गुण आपले अंगी आणण्याविषयी त्यांनी मनापासून झटावे.”

**संस्था स्थापन झालेचा कोल्हापूर संस्थांच्या गॅझेटमधील जाहीरनामा :**

राजर्षि शाहू महाराजांनी श्री शाहू मराठा विद्यार्थी वसतिगृहाची स्थापना केल्याचे जाहीर करण्यासाठी एक जाहीरनामा काढला. ‘जाहीरनामा जनरल खाते तारीख ३१ मे १९०१ नंबर ५० - सर्व लोकांस कळण्यासाठी प्रसिद्ध करण्यात येते की, परलोकवासी मलिका मा. अझमा व्हिक्टोरिया केसर-ई-हिंद यांचे स्मारकाप्रित्यर्थ कोल्हापूर येथे मराठे ज्ञातीच्या लोकांचे हित करण्याच्या हेतूने "मराठा एज्युकेशन सोसायटी" नांवाची संस्था स्थापन झाली असून तिचे स्वामिभक्तीयुक्त व स्तुत्य असे हेतु व मराठे ज्ञातीची मागासलेली स्थिती मनात

आणून, श्रीमन्महाराज छत्रपतीसाहेब सरकार करवीर यांनी, सदर संस्थेस, आपला पैसा सरकारचे खजिन्यांत भरणा करण्याची परवानगी देऊन. तो पैसा व्याजी लावून त्याची व्यवस्था करण्याचे बाबतींत खालील नियम ठरविले आहेत'

**संस्थेच्या स्थापने संदर्भात वर्तमान पत्रातील प्रशस्ती :**

कोल्हापुरांत नव्यानेच स्थापन झालेल्या या अभिनव संस्थेचे स्थानिक व पुणे-मुंबई सारख्या ठिकाणच्या इंग्रजी आणि मराठी वृत्तपत्रांनी हार्दीक स्वागत केले. त्यामुळे संस्थेच्या कार्यकर्त्यांत उत्साह निर्माण होऊन त्यांच्या कार्याला चालना प्राप्त झाली.

**समर्थ वर्तमानपत्र :**

श्री शाहू मराठा विद्यार्थी वसतिगृहाची स्थापना झाल्यानंतर कोल्हापूरमधील प्रो. विजापूरकर संपादित करत असलेल्या 'समर्थ'वर्तमानपत्रात दि. १ मे १९०१ रोजी एक विशेष लेख प्रसिध्द झाला त्या लेखात संस्थेच्या स्थापने संदर्भात म्हणतात की, "ता. १८-४-१९०१ हा दिवस एका दृष्टीने कोल्हापूरच्या विक्षणांच्या इतिहासांत महत्वाचा समजला पाहिजे. 'अशी त्या लेखाची सुरूवात असून हल्ली जी मंडळी तरतरीने काम करू लागली आहेत ती आरंभशूर ठरली तरच दुर्देव, पण आमच्या शहरी तीन मराठे पदवीधर चांगल्या स्थितीत असल्याने त्यांनी आपल्या जातभाईची मने वळवून एका मोठ्या उपयुक्त संस्थेची उभारणी केली याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे तितके थोडे आहे. रा. सा. जाधव, रा. सा. विचारे, रा. सा. सावंत यांनी या कामी अत्यंत कळकळ दाखवून फार परिश्रम केले. असें श्रम करणारे पुढारी ज्या जातीत उत्पन्न होतील तिची उर्जितावस्था होण्यास विलंब लागणार नाही. ज्यांना सूचना व अनुमोदन हे शब्द व असल्या शिक्षणोपयोगी संस्थाचे महत्व विशेष माहीत नाही, अशांचा हात धरून त्याजकडून नवीन कामाचा कित्ता गिरविणे हे काही सामान्य काम नव्हे. हे काम ज्या ब्राम्हण जातीतील पदवीधर मंडळीकडून झाले नाही त्यांनी संस्थेविषयी अनादरयुक्त भाषण करणे म्हणजे गुणग्रहणाची आपली पात्रता कमी झाली असें प्रदर्शित करणे होय. आमचे दयाळु व प्रेमळ प्रभू श्री शाहू छत्रपती महाराज, अशात-हेने जे लोक परिश्रम करतील त्यास सहाय्य करत्यास सदा सिद्ध असतात याविषयी आम्हांस शंका नाही.

पृथक पृथक जातीची व्यवस्था त्या जातीतील पुढाऱ्यांनी आपापला फंड जमा करून केली तर ठीकच. अलिकडे ही प्रवृत्ती सुमारे पंधरा वर्षांत पडली आहे. ब्राम्हणेत्तर मंडळीनी हा उपक्रम सुरू केला आहे. नाही म्हणावयास ब्राम्हणातही "माध्यदीन मित्र समाज" म्हणून एक त्याच शाखेच्या उत्तेजनासाठी काढलेली संस्था आहे. सारस्वत ब्राम्हणही याच मार्गाचा अवलंब करीत आहेत. कोणत्याही चळवळीत थोडेबहुत व्यंग असणार. जाती जातीच्या उद्योगांत सर्व आर्य बंधूच्या ऐक्यास किंचित् लांघव येते. परंतु सर्व समंजसपणाच्या शिक्षणाने व व्यापक विचाराने हे कमी होईल, हाच विचार मनात आणून जाती जातीच्या प्रयत्नाचा नंबर दुसरा असला तरी त्याचेहि कै. न्यायमूर्ति रानडे अभिनंदनच करीत असत. अशामुळेच पुण्याची "मराठा असोसिएशन", धारवाड येथील "लिंगायत फंड", "पाठारे प्रभू रीलिफ फंड", "दैवज्ञ कास्ट फंड" ठिकठिकाणचे जैन समाज व कायस्थ प्रभूचे फंड इत्यादि संस्थादि संस्थाच्या उपयुक्ततेबद्दल ते त्या त्या जाती जातींतील पुढाऱ्यास वाखाणींत असत."

**दिनबन्धू साप्ताहिक :**

ब्राम्हणेत्तर चळवळीचे मुखपत्र असलेल्या दिनबन्धू साप्ताहिकामध्ये दि. २८ जून १९०६ रोजीच्या अंकातील संस्थेसंबंधी माहिती आली होती. त्यामध्ये ते लिहितात की, 'ज्या शिवछत्रपतींच्या योगाने आमच्या ज्ञातीचे अस्थित्व आहे. त्या छत्रपतींच्या कुलात ज्याचे जन्म झाले आहेत त्याजकडून या संस्थेला मदत मिळावी ही अभिमानाची गोष्ट आहे. त्यांची योग्य जोपासना करून त्यास चांगल्या वृक्षाचे स्थितित आणण्याचे श्रेय योग्यकाली श्रीमंत युवराज महाराज घेतील अशी आम्हा सर्वांना उमेद आहे.'

**श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनी संस्थेचा केलेला गौरव:**

श्रीमंत सयाजीराव महाराज यांना संस्थेतर्फे मानपत्र देण्यात आले. या मानपत्राला उत्तरादाखल केलेल्या भाषणात श्रीमंत सयाजीराव महाराज यांनी व्यक्त केलेले विचार आजच्या काळातही मोठे उद्‌बोधक आहेत. म्हणाले की, जातीभेदामुळे आपल्या राष्ट्राची फार मोठी हानी झालो आहे. त्यामुळे अशा भेदमूलक सस्थाचे

समर्थन फक्त एकच दृष्टीने शक्य आहे ते असे की, आज कार्याच्या सोयो साठी म्हणून जरी हे भेदभाव राखले गेले तरी अखेरीस ते सर्व नष्ट होऊन आपल्याला एक हिंदू राष्ट्र बनवावयाचे आहे. या सर्व भेदभावाची परिणति ऐक्यामध्ये झाली पाहिजे. सध्याच्या पृथकपणाचे समर्थन करता येईल तर ते या एकाच दृष्टीने करता येईल.

विद्यार्थी वसतिगृहापासून फार फायदे होतात. 'व्यक्ति तितक्या प्रकृति' या नात्याने निरनिराळया स्वभावाचे निर निराळे गुणदोष अंगी असलेले विद्यार्थी एकत्र येतात. दुसऱ्याचे बरेवाईट सोसून घ्यावे लागल्यामुळे मनाला मोठेपणा येतो चांगल्याची सगत धरुन वाईटाची संगत टाळणे अवश्य अस त्यामुळे मनुष्य स्वभावाची पारख करण्याची पात्रता अंगी येते.

सर्व समाज अज्ञ असता एकच वर्ग पुढे गेला तर त्याची भरभराट कायम न टिकता इतरांच्या अज्ञानाचे दुष्य परिणाम त्यानाहि भोगावे लागतील. याचे उदाहरण आमच्या ब्राम्हण वर्गात पहावयास मिळेल. ब्राम्हणांनी इतर जातीना जाणून बुजून अज्ञानात ठेविले किंवा नाही. या वादात शिरण्याची माझो इच्छा नाही. परंतु इतर जातीच्या उन्नतीची खटपट त्यानी केली नाही व त्याचे दुष्परिणाम आज त्यांना भोगावे लागत आहेत.

सर्व मनुष्ये परमेश्वराच्याच घरचे प्राणी आहेत. त्याने कांही भेदभाव ठेविला नाही असे असताना आपण निष्कारण उच्च नीचपणाचे अवडंबर माजवितो हे बरे नव्हे.

ट्रान्सव्हॉलांतील गोऱ्या लोकांना अन्यायाने वागवावे असे माझे म्हणणे नाही. जे तसे वागवितात त्यांचा मी निषेधच करतो. परंतु त्याना जर आम्ही दोष देतो तर आमच्या लोकाना आम्ही कितीतरी दोष दिला पाहिजे.

कोल्हापुरात जातजातीची मने परस्पर विषयक साफ नाहीत, असे ऐकतो. समाज उन्नतीकरिता प्रयत्न करु लागला, समाज संक्रमणावस्थेमध्ये असला म्हणजे प्रसंग यावयाचेच याबद्दल कोणीहि विषाद मानू नये. जे मागे पडले आहेत. त्यांना सर्वानी हातभर लावून पुढे आणावयाचे आहे. महाराजानी मागासलेल्या जातीना ज्या शिक्षणाच्या सवलती दिल्या आहेत. त्या इतर जातीचे नुकसान करावे म्हणून नव्हेमागासलेल्या जातीना शिक्षण मिळून त्या इतराच्या बरो बरीच्या झाल्या म्हणजे पुढे एक दिवस देखील महाराजानी या सवलती त्यांना देऊ नयेत. त्यानंतर त्यांना सवलती देणे म्हणजे अन्याय व पक्षःपात करणे होईल व महाराज तसे कर णार नाहीत अशी माझी खात्री आहे. अशी वेळ यायला पुष्कळ अवकाश आहे. परमेश्वर महाराजाना उदंड आयुष्य देवो परंतु महाराजांच्या कारकिर्दीत अशी वेळ येईल असे मला वाटत नाही. त्यांच्या मुलांच्या कारकिर्दीत येईल त्यावेळी त्यांनी ही सवलत एक दिवस देखोल पुढे चालवू नये, प्रजेला शिक्षण देणे हे राजाचे कर्तव्य आहे. प्रजा जर अशि क्षित असेल तर राज्यकारभोर दुर्घट होईल. म्हणून प्रजेला राजाने फुकट व सक्तीचे शिक्षण दिले पाहिजे. इंग्रजी सरकार सार्वभौम व कर्तु मर्तुम अन्यथा कर्तुम समर्थ आहे. ते या बाब त त कांहीहि करो परंतु आम्ही राजे लोकांनी आपल्या हातून होईल तितके कार्य केले पाहिजे.

**वसतिगृहाची सुरवात अन स्थलांतर :**

'मराठा एज्युकेशन सोसायटी' ची स्थापना होवून त्याअंतर्गत श्री शाहू मराठा विद्यार्थी वसतिगृहाची सुरवात झाली. मात्र संस्थेचा पाया लगेच स्थीर झाला होता असे म्हणता येणार नाही. वसतीगृहाची सुरुवात तशी अडखळत झालेली होती, या काळात कोल्हापूरमध्ये प्लेगची साथ आली होती त्यामुळे जागेचा मोठा प्रश्न होता श्री. पी. सी. पाटील, शेख अब्दुल्ला, श्री. आर. पवार तीन विद्यार्थ्यांच्या साठी वसतिगृहाची सोय दसरा चौकातील रिसाल्या जवळील फॉरेस्ट हाऊसच्या आउट हाऊस मध्ये करण्यात आली होती. यामध्ये क्लब सिस्टीम च्या धर्तीवर मिस चालवली जात असे व हे काम श्री गोविंदराव नानासाहेब सासणे यांच्या देखरेखीखाली होत असे. सासणे गुरुजींनी मोठ्या हिमतीने या वसतिगृहाची मुहूर्तमेढ अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न केला. फॉरेस्ट खात्याच्या बंगल्यांत संस्थेला फार काळ राहता आले नाही. सुरुवातीच्या तीन विद्यार्थ्यावरुण ती संख्या बारा झाली. जागा अपुरी असल्याने सर्व विद्यार्थ्यांना श्री. मामासाहेब खानविलकर यांच्या सध्याच्या कसबा गेट जवळील वाड्यांत नेण्यात आले. परंतु तेथूनही वसतिगृहाला स्थलांतर करावे लागले आणि ते दुतोंडी मारुती जवळच्या (जुना बुधवार) दुसऱ्या एका भुसारी वाड्यात आले. याठिकाणी मात्र संस्थेचा संसार एका वर्षापुरता सुरळीत चालला होता. पहिले चार महिने वसतिगृहाचे सतत स्थलांतर सुरू होते वारंवार करावे लागणारे स्थलांतर यामुळे संस्थेला काही स्थैर्य लाभत नव्हते संस्थेला स्थैर्य आणण्याच्या दृष्टीने काहीतरी करावे या संदर्भामध्ये श्री.

बापूसाहेब घाडगे व सर्जेराव वजारत यांनी कोल्हापूर संस्थानात पेठा निहाय फिरून संस्थेस देणग्या गोळा करून संस्थेचा आर्थिक प्रश्न मार्गी लावला.

संस्थेला स्थैर्य आणण्याच्या दृष्टीने काहीतरी उपाययोजना त्वरीत करणे अगत्याचे आहे याची जाणीव महाराजांना झाली.त्यांनी संस्थेला सुमारे पंचवीस हजार रुपये किंमतीची छोटीशी इमारत व विस्तीर्ण अशी जागा दिली. या इमारतीत पूर्वीवस्तुसंग्रहालय होते. नंतर प्लेगचे हॉस्पिटलझाले. या इमारतीचा योग्य उपयोग व्हावा यासाठी महाराजांनी ती जागा संस्थेला देऊन केली. शाहू महाराज एवढ्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी संस्थेला ४ हजार रुपयांची उदार देणगी दिली. मराठ्यांच्या मुलांस खास आर्थिक मदत करण्याकरिता म्हणून त्यावेळी सुमारे ५०० रु. वार्षिक उत्पन्न येणारी जमीन दिली. दरसाल वार्षिक मदत म्हणून ५५० रु. अव्याहतपणे मिळतील अशी तरतूद केली. संस्थेचा निधी वार्षिक  शेकडा ८ रु. व्याजाप्रमाणे दरबारकडे ठेऊन घेतला आणि राजाराम हायस्कूलमधील शिक्षकांना संस्थेचे सुपरिटेंडेंट म्हणून काम करण्यास परवानगी दिली. राजर्षि शाहू महाराजांनी दूर दृष्टीने केलेल्या या तरतुदीमुळे संस्थेला एक प्रकारचे स्थैर्य आले. नंतरच्या सोळा वर्षात या संस्थेचा प्रथम अहवाल सन १९१७ मध्ये प्रथम प्रसिद्ध झाला त्यामध्ये पाहावयास मिळतो.

**श्री शाहू विद्यार्थी वसतिगृहाचे पहिल्या वर्षाचे विद्यार्थी :**

श्री शाहू विद्यार्थी वसतिगृहाचे पहिल्या वर्षाची विद्यार्थी संख्या ०३ वरून झाली आणि सन १९०१ या संपूर्ण सालांमध्ये ती १२ इतकी झाली. यामध्ये आर. एस. खापरे,एम. एस. मचाले, बी. आर. महाडीक, ए. एल. परभ, जी. एस. माने, डी. बी. जाधव, श्रीपतराव पैलवान (बोर्डींगचे भोजन व्यवस्थापक), एन. एम. पोवार, श्री. शिंदे, जी. एन. पिसाळ, बाबासो डफळे, श्री. जाधव, आर. आर. पोवार, बी. जे. पारळे, जी. आर. निंबाळकर, शेख अबदुल्ला, पी. सी. पाटील, पी. के. शिंदे, के. सरनाईक, ए. पी. पार्टे, के. डी. माने, आर. बी. गायकवाड, एच. के. साळोखे, श्री. जाधव बेळगांव, श्री. मोरे इत्यादींचा समावेश होता.

**राजाराम महाराजांच्या काळातील संस्थेचा विकास आणि कार्य :**

आपल्या वडिलांच्या सामाजिक सुधारणांचा वारसा चालवणाऱ्या छ. राजाराम महाराजांनी या वसतिगृहाच्या खर्चासाठी विविध ठिकाणी जमिनी व मिळकती लावून दिल्या. या वसतिगृहास श्रीमंत सयाजीराव गायकवाड (बडोदा), श्रीमंत तुकोजीराव पवार (देवास), सवाई तुकोजीराव होळकर (इंदोर), श्रीमंत फत्तेसिंग महाराज (अक्कलकोट), श्रीमंत प्रतापसिंग महाराज (बडोदा) यासह अनेक दानशूर व्यक्तींनी भरीव स्वरूपाच्या देणग्या प्राप्त करून दिल्या. छ. राजाराम महाराजांच्या कारकीर्दीत या वसतिगृहाचा विस्तार झाला. विद्यार्थ्यांची संख्या वाढल्याने सन १९३५ मध्ये 'राजाराम विभाग'छत्रपती राजाराम महाराजांनी बहुजन समाजातील होतकरू विद्यार्थ्यांनी परदेशामध्ये जाऊन आपले शिक्षण पूर्ण करावे नाव लौकिक वाढवावा आणि शैक्षणिक उन्नती करावी यासाठी त्यांनी 'फॉरेन एज्युकेशन फंड' नावाची संकल्पना या वसतिगृहाच्या माध्यमातून राबवण्यास सुरुवात केली. परंतु दुर्दैवाने त्यांच्यावर काळाने आकस्मात झडप घातल्याने ती योजना मूर्तस्वरुप धारण करू शकली नाही. राजाराम महाराजांचे अपुरे राहिलेले हे स्वप्न अंशतः तरी पुरे व्हावे या दृष्टीने संस्थेचा संकल्प असून त्याची अल्पशी सुरवात म्हणून १९५० साली बहुजन समाजांतील एक होतकरू विद्यार्थी श्री. बी. बी. पोवार यांना परदेशांत जाऊन उच्च शिक्षण घेण्यासाठी तीन हजार रुपये कर्जाऊदिले. परदेशात जाऊन या फंडाच्या माध्यमातून पोवार आपले शिक्षण पूर्ण करून आले.

छत्रपती राजाराम महाराजांना हा फंड आणखी विस्तृत करून त्या माध्यमातून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना युरोपमध्ये शिक्षण व शिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्याचा त्यांचारेल्वे स्टेशन जवळ दिलेल्या जागेमध्ये मार्केट बांधण्यासाठी राजाराम महाराजांनी त्या काळात वसतिगृहाला तीस हजार रुपये देऊ केले होते. राजाराम महाराजांचे केलेले हे कार्य आणि उपलब्ध करून दिलेल्या पैसा हा मोठा धाडसी निर्णय होता छत्रपती राजाराम महाराजांनी श्री शाहू मराठा विद्यार्थी वसतिगृहाची त्या काळातील आर्थिक अडचण आणि चणचण दूर करण्यासाठी भरीव असे आर्थिक सहाय्य आणि दिन्या संस्थेला देऊन खूप मोठे उपकार केलेले आहेत संस्थेला आर्थिक संपन्नता आणण्यासाठी सध्याच्या रेल्वे स्टेशन जवळची म्हणजे सध्याची गोकुळ हॉटेलची जागा राजाराम महाराजांनी संस्थेला देणगी म्हणून दिली या ठिकाणी मार्केट बांधून पैसा उपलब्ध करावा अशी त्यांची

अपेक्षा होती. पुढे सन १९४७ मध्ये हे बांधकाम पूर्ण झाले. डी. एम. भोसले, श्री. आचरेकर, डॉ. शिरोडकर यांच्या माध्यमातून या जागांचा विकास घडवून आणला याशिवाय भेडसगाव, ऐनापुर, हातकणंगले पोर्ले इत्यादी ठिकाणच्या जमिनी संस्थेस इनाम म्हणून दिल्या. कोल्हापुरच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या शिवाजी मार्केटच्या कोपऱ्यावरील दोन दुकान गाळे संस्थेला बक्षीस म्हणून दिले. या सर्व मालमत्तांच्या माध्यमातून संस्थेला त्याकाळात मोठा आर्थिक आधार लाभला व मिळालेल्या उत्पन्नातून बहुजन समाजातील अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक लाभ घेता आला. दरबाराकडून मिळत असलेलीछत्रपती राजाराम महाराजांच्या काळात कोल्हापूर दरबाराकडून मिळत असलेली ५५० रुपयांची आर्थिक मदत वाढवून ती एक हजार पाचशे पन्नास रुपये इतकी प्रतिवर्षी केली. छत्रपती राजाराम महारजांचे वसतिगृहाच्या प्रशासनावर आणि विद्यार्थ्यांच्यावर बारकाईने लक्ष होते.

**श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचा सुवर्ण महोत्सव :**

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष दि. ३० एप्रिल १९५४ रोजी साजरे करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून स्वर्गीय यशवंतराव चव्हाण उपस्थित होणार होते. मात्र स्व. चव्हाण साहेब आजारी असल्याने ते या कार्यक्रमास येऊ शकले नाहीत त्यांच्या ऐवजी डॉ. डी. आर. धनवडे यांच्या अध्यक्षतेखाली व श्री शहाजी छत्रपती महाराज, मातोश्री विजयमाला महाराणीसाहेब, इंदुमती राणीसाहेब महाराज यांच्या प्रमुख उपस्थित हा सोहळा संपन्न झाला. या प्रसंगी श्री शहाजी महाराजांनी एक दीर्घ भाषण केले. त्या मध्ये ते म्हणतात की, 'समाजांतील ओक वर्ग पुढारलेला रहावा व दुसरा मागासलेला असावा ही गोष्ट माझे आजोबा राजर्षिंना मान्य नव्हती. त्यांची दृष्टी समतेची व मानवतावादी होती. बहुजनसमाजाची सर्वांगीण उन्नति झाल्यावांचून राष्ट्राची खरो उन्नति झाली असे म्हणता येणार नाही हे त्यांचे ब्रीदवाक्य होते. अज्ञान व दारिद्रयांत खितपत पडलेल्या या विराट समाजाला जागृत करण्यासाठी शिक्षण हेच अकमेव साधन आहे. हे राजर्षिनी ओळखून समाजांतील सर्व ज्ञातींच्या शिक्षण कार्याला सक्रीय सहाय्य करून आदर्श राजधर्माला साजेशा मार्गाच अवलंब केले. निरनिराळया शैक्षणिक संस्था व वसतिगृहे स्थापन केली व त्यांना सढळ हातानी मदत करून वार्षिक उत्पन्ने देऊन त्या संस्थांना कार्यक्षम केले. गोरगरिब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या दिल्या. शैक्षणिक कार्याची मर्यादा फक्त आपल्या संस्थानापुरतीच न ठेवता त्याची व्याप्ति सर्वत्र व्हावी म्हणून निरनिराळ्या भागांतील सुरशिक्षित उदयोन्मुख तरुणांना एकत्र आणून त्या त्या भागांत त्यांच्या कडून अशा त-हेच्या संस्था स्थापन करण्यास सक्रीय उत्तेजन दिले. अज्ञानाने जखडलेली रुढीची बंधने नाहीशी करून बहुजन समाजांत नवचैतन्य निर्माण केले. या संस्थेच्या नामाभिधानांत जरी 'मराठा वसतिगृह' असा उल्लेख असला तरी येथे कोणत्याही जातीच्या विद्यार्थ्याची इच्छा असल्यास त्यांना प्रवेश देण्याची प्रथा पूर्वीपासून चालू आहे. सर्व जातींतील लोकांना समतेने वागविण्याची राजर्षिची दृष्टी याप्रकारे संस्थेचे चालक आचरीत आले आहेत ही फार समाधानाची गोष्ट आहे. राजर्षिच्या पश्चात आमचे परमपूज्य पिताजी कै. श्रीमच्छत्रपति राजाराम महाराज यांनीही या संस्थेचे अपत्यवत् लालन पालन केले व तिच्या वाढीकरिता शक्य ते सर्व प्रयत्न केले. या वसतिगृहाला सुवर्ण महोत्सवाचा मंगल व वैभवशाली काल प्राप्त करून देण्यास त्यांचेच परिश्रम का रणीभूत झाले आहेत हे नमूद करताना आम्हास आनंद व अभिमान वाटतो. राजर्षि श्री शाहू महाराज व शिक्षणप्रेमी श्री राजाराम महाराज या भाग्यशाली छत्रपतिद्वयांचे या संग्थेवर अपत्यवत् प्रेम होते. या संस्थेबद्दल आम्हास आलेपणा वाटतो. तसेच संस्थेच्या माजी विद्याथांनी केलेली कामरिणी नजरेपुढे आणता या संस्थेबद्दल आम्हास अभिमानही वाटतो. संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनी या संस्थेवर मातृवत् प्रेम ठेवावे असे आम्ही याप्रसंगी सुचवू इच्छितो. याबाबतींत संस्थेच्या सुरुवातीचे विद्यार्थी व आज आपल्यापट्टे असणारे ज्ञानसंपन्न व वयोवद्ध डॉ. पी. सी. पाटील हे एक उदाहरण म्हणून घेता येण्या सारखे आहे. त्यांच्याप्रमाणे सर्व माजी विद्यार्थ्यांनी या संस्थेबद्दल आत्मीयता बाळगल्यास संस्थेचा भविष्यकाल उज्वल झाल्याशिवाय रहाणार नाही अशी आतांस खात्री वाटते.'

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त लाभलेले अध्यक्ष डॉ. डी. आर. धनवडे यांनी याप्रसंगी केलेल्या भाषणात म्हणाले, 'बहुजन समाजात शिक्षण प्रसार होण्यासाठी अशा वस्तीगृहांची जरुरी आहे व लोकशाही सरकारने अशा संस्थांना मदत केली पाहिजे नव्हे तर ते सरकारचे आद्य कर्तव्य आहे. श्री

शहाजी छत्रपती महाराजांनी याप्रसंगी संस्थेला वार्षिक एक हजार रुपयाची वार्षिक ग्रँट जाहीर केली. संस्थेस राजर्षी शाहू महाराजांच्या पासून ५५०/- रुपयांची वार्षिक ग्रॅट मिळत होती. छत्रपती राजाराम महाराजांनी ही ग्रँड वाढवून १५५०/- रुपये केली. ही ग्रॅट कोल्हापूर संस्थान स्वतंत्र भारतात विलीन होईस तोपर्यंत प्राप्त होत होती.

**शहाजी विभागाचे उद्घाटन :**

श्री शाहू मरठा विद्‌यार्थी वसतिगृहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची राहण्याची आणखी सोया व्हावी यासाठी श्री शहाजी विभाग या वसतिगृहाची नव्याने उभारणी करण्यात आली. शहाजी विभागाचे उद्‌घाटन श्री बापूसाहेब गायकवाड यांच्या हस्ते दि. ९ जानेवारी १९५५ रोजी करण्यात आले. बापूसाहेब गायकवाड याप्रसंगी म्हणाले की, ‘बहुजन समाजाचे उद्धारक राजर्षी शाहू छत्रपती महाराजयांनी या संस्थेत जन्म दिला असून त्यांच्या नावाने चाललेल्या या वसतिगृहातील एका नवीन इमारतीस त्यांच्या लाडक्या नातवाचे विद्‌यमान छत्रपतींचे नाव देण्यात संस्थेच्या चालकांनी एक प्रकारे औचित्य दाखवले आहेत्याबद्दल त्यांचे मी अभिनंदन करतो. छत्रपतींचा मी एकनिष्ठ सेवक असून छत्रपतीचा आशिर्वाद असलेल्या व त्यांच्या नावाची निगडित असलेल्या या संस्थेबद्दल आपुलकीच वाटते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. डी. आर. धनवडे हे होते.

**संस्थेच्या नावात झालेले बदल :**

राजर्षि शाहू छत्रपती महाराजांच्या प्रेरणेतून स्थापन झालेल्या ‘मराठा एज्युकेशन सोसायटी’तर्फे बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्यासाठी चालविली जात असलेल्या वसतिगृहाचे नाव ‘व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस’ असे होते. राजर्षि शाहू छत्रपती महाराजांनी या संस्थेच्या व वसतिगृहाच्या विकाससाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले, बहुजन समाजाच्या उद्धारासाठी आपले आयुष्य वेचले यासाठी त्यांचे नाव या संस्थेस देणे औचित्याचे असल्याने सन १९४८ मध्ये 'मराठा एज्युकेशन सोसायटी' व 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस' या संस्थांना अनुक्रमे 'श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था' व 'श्री शाहू छत्रपती विद्‌यार्थी वसतिगृह' कोल्हापूर असे संबोधण्यात यावे असा ठराव केला. दि. १६ ऑगस्ट १९५२ रोजी झालेल्या संस्थेच्या सर्वसाधारण सभेत संस्थेच्या वरील ठरावामध्ये थोडा बदल करून सदर संस्थेच्या व संस्थेने चालविलेल्या वसतिगृहाच्या नावात 'श्री शाहू छत्रपती मराठा शिक्षण संस्था' व 'श्री शाहू छत्रपती मराठा विद्‌यार्थी वसतिगृह' असा बदल करण्यात करण्याचा निर्णय घेतला. संस्थेच्या नावात बदल करणे संदर्भात संस्थेच्या सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक तीन मांडण्यात आला. या ठरवानुसार ‘सदर संस्थेची व संस्थेने चालविलेल्या वसतिगृहाची ‘मराठा एज्युकेशन सोसायटी’ व ‘व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस’ अशी जी नावे होती त्याऐवजी ‘श्री शाहू छत्रपती मराठा विद्‌यार्थी वसतिगृह’ असे संबोधण्यात यावे’ असा निर्णय घेतला.

श्री शहाजी छत्रपती महाराजांनी सन १९६७ मध्ये छत्रपती राजाराम महाराजांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक कार्याचे चिरंतन स्मारक व्हावे यासाठी श्री राजाराम छत्रपती मेमोरियल ट्रस्टची स्थापना केली. श्री शहाजी छत्रपती महाराजांनी श्री राजाराम छत्रपती मेमोरियल ट्रस्टसाठी जे गव्हर्निंग कौन्सिल नेमले त्यामध्ये श्री शाहू मराठा विद्‌यार्थी वसतिगृहाच्या कार्यकारी मंडळातील अकरा सभासदांची नेमणूक केलेली होती. श्री शाहू छत्रपती मराठा शिक्षण संस्थेने श्री राजाराम छत्रपती मेमोरियल ची सर्व जबाबदारी स्वीकारावी व ते कार्य पुढे करावी अशी इच्छा व्यक्त केली. श्री शहाजी महाराजांच्या या भूमिकेमागे श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था ही मराठा समाजाची केंद्र संस्था व्हावी असा उद्देश होता. श्री शाहू छत्रपती मराठा शिक्षण संस्था व श्री राजाराम छत्रपती मेमोरियल या दोन्ही संस्थांची ध्येय धोरण उद्दिष्ट कार्य आणि दोन्ही संस्थांचे कार्यकारी मंडळ व गव्हर्निंग कौन्सिल एकच असल्याने त्यांच्या एकीकरणाने चांगल्या प्रकारे कार्य करता येईल म्हणून दोन्ही संस्थांचे श्री शाहू छत्रपती मराठा शिक्षण संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या विनंतीनुसार श्री शहाजी छत्रपती महाराजांच्या परवानगीने एकीकरण करण्यात करण्याचा निर्णय घेतला. दि. ११ एप्रिल १९७२ रोजी श्री शाहू छत्रपती मराठा शिक्षण संस्थेच्या कार्यकारी मंडळाने घेतलेला. या सभेत खलील प्रमाणे ठराव झाला. ‘ठराव क्रमांक ४३ नुसार श्री शाहू छत्रपती मराठा शिक्षण संस्था आणि श्री राजाराम छत्रपति मेमोरियल या दोन्ही संस्थांचे ध्येय धोरण उद्दिष्टे आणि कार्य क्षेत्र एकच असल्याने आणि या दोन्ही संस्थांचे कार्यकारी मंडळ व गव्हर्निंग कौन्सिल एकच असल्याने दोन्ही संस्थांच्या पद्धतीने अंमलात येईल अशी खात्री पटल्याने श्री राजाराम

छत्रपति मेमोरियल ट्रस्टचे पेट्रेन-इ-चीफ श्री शहाजी छत्रपती महाराज साहेब यांनी श्री शाहू छत्रपती मराठा शिक्षण संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या विनंतीला मान देवून मान देऊन आणि त्यांना पेट्रेन-इ-चीफ या नात्याने घटनेनुसार प्राप्त झालेल्या अधिकारानुसार दोन्ही संस्थांचे एकत्रीकरण करण्यास मान्यता दिल्याबद्दल ही सभा त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानत आहे तसेच या एकत्रीकरण आनंतर दोन्ही संस्थांची मिळून एकच नवी घटना अमलात आणून पेट्रेन-इ-चीफ यांना एकत्रीकरण यासंबंधी अर्जात नमूद केलेली अटी नवीन घटनेच्या उद्दिष्टात समाविष्ट करून त्याची अंमलबजावणी करण्याची हमी ही सभा श्री हुजुर स्वामींना देत आहे अशी सूचना श्री सर्जेराव अण्णासाहेब पाटील मंडळी त्याला श्री डी. जे. शिंदेअनुमोदक दिले आणि ठराव मंजूर करण्यात आला.'दोन्ही संस्थांची मिळून एकच नवीन घटना तयार करण्यासाठी ७ मे १९७२ रोजी संस्थेच्या कार्यकारी मंडळाची सभा संपन्न झाली. या सभेमध्ये ठराव क्रमांक ४ नुसार नवीन घटना तयार करण्यात आली व या नव्या घटनेत श्री शाहू छत्रपती मराठा शिक्षण संस्थेच्या नावातील मराठा हा शब्द वगळण्यात आला व श्री राजाराम छत्रपती मेमोरियल चे ध्येय धोरण उद्दिष्ट आणि कार्य समाविष्ट करण्यात आली या संस्थेच्या ध्येयाशी व कार्याची सुसंगत होती त्यामुळेमे. चारिटी कमिशनर महाराष्ट्र यांच्या १४ ऑगस्ट १९७३ चा हुकुमाप्रमाणे श्री शाहू छत्रपती मराठा शिक्षण संस्था व श्री शाहू छत्रपती मराठा विद्यार्थी वसतिगृह आणि श्री राजाराम छत्रपती मेमोरियल या सार्वजनिक न्यासाची विलीनीकरण करण्यात आले व या तिन्ही संस्थांच्या मिळून 'श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था' असे नाव देण्यात आले आणि या नव्या नावाने न्यासची नोंदणी करण्यात आली.

**शैक्षणिक, सांस्कृतिक आणि शिवजन्मोत्सवाची परंपरा :**

श्री शाहू मराठा विद्यार्थी वसतिगृहाच्या माध्यमातून प्रतिवर्षी विविध उपक्रम राबवले जात असत. सांस्कृतिक कार्यक्रम व विविध क्रीडा प्रकारांचे आयोजन मोठ्या उत्साहाने साजरे होत असत. श्रीमंत आईसाहेब महाराज यांच्या उपस्थितीत खास शिवजन्मोत्सव प्रतिवर्षी संस्थेच्या प्रांगणात मोठ्या दिमाखात साजरा होत असे. ही परंपरा श्रीमंत आईसाहेब महारजांच्या मार्गदर्शनाखाली दीर्घकाळ चालू होती. छत्रपती राजाराम महाराज प्रती वर्षी शिवजयंतीसाठी १५० रुपये वर्गणी देत असत. या प्रसंगी संस्थांनातील सर्व खसे सरदार, इनामदार, जहागीरदार उपस्थिती असत.

श्री शाहू छत्रपती मराठा वसतिगृहाचा विकास व्हावा, विद्यार्थ्यांचा बौदिक दर्जा वाढवा, जगातील देशांच्या घडामोडीचे सम्यक ज्ञान त्यांना व्हावे यासाठी अविश्रांत परिश्रम करणारे कै. भास्करराव जाधव, कै. दाजीराव विजारे, कै. जिवाजीराव सावंत ही मंडळी प्रमुख होती. भास्करराव जाधव विद्यार्थ्यांना इतिहास शिकवित असत. दाजीराव विचारे त्यांना गणित विषयांत मार्गदर्शन करीत असत आणि इंग्रजी विषयातील तज्ञ जिवाजीराव सावंत हे विद्यार्थ्यांकडून इंग्रजीचा चोख अभ्यास करवून घेत असत. याशिवाय गुरुवर्य गोविंदराव सासने हे विद्यार्थ्यांना विविध विषयाचे मार्गदर्शन करीत असत. विद्यार्थ्याचे आरोग्य उत्तमप्रकारे रहावे,त्यांना वैद्यकिय मदत मोफत मिळावी याविषयो महाराजांनी तरतूद करुन ठेवली होती. के. बळीवा पाटोल, रामचंद्रराव धनवडे आणि श्री. संकपाळ ही मंडळी केवळ हुजूर आशाच म्हणून नव्हे तर एक सामाजिक कर्तव्य या नात्याने वसतिगृहाला वारंवार भेट देऊन विद्याथ्र्यांची सर्वतोपरी काळजी घेत असत. अशा प्रकारची आदर्श व्यवस्था महाराष्ट्रातील तत्कालीन कोणत्याही वसतिगृहांत नव्हती हे अभिमानपूर्वक नमूद करण्यासारखे आहे. वसतिगृहातर्फे निरनिराळे समारंभ घडवून आणले जात असत आणि त्यांचा सर्च विद्यार्थावर वा वसतिगृहावर न बसविता महाराज स्वतःच्या खासगीतून करत असत. या काळात रा. ब. खासेराव जाधव, रा. ब. विठ्ठलराव वडेकर, श्री. दाजीराव दळवी, इतिहासकार श्री. केळूसकर वगैरे तत्कालीन पुढाऱ्यांनी संस्थेला भेट देऊन चालकांना आणि विद्यार्थ्यांना यथायोग मार्गदर्शन केले. केवळ वसतिगृहांतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नैतिक व आरोग्यविषयक विकासा बाब लक्ष देऊन न थांबता संस्थच्या विद्यार्थ्यांनो मैदानी व मर्दानी खेळांत प्रामुख्याने भाग यावा यासाठी सुरवातीपासून लक्ष देयांत आले आहे संस्थेच्या सुरवातीच्या विद्यार्थ्यांपैकी डॉ. पी. सी. पाटील यांनी कॉलेजच्या पहिल्या तुकडीत असताना एका चुरशीच्या कुस्तीत जपूर्व असा विजय मिळवून राजर्षि शाहू महाराजांच्याकडून वाहवा मिळविली. राजर्षि शाहू महाराज मल्ल विवेचे कसे शोकीन होते. ही माहिती नव्याने सांगण्याचे कारण नाही. त्यांच्याच प्रेरणेने डॉ. पी. सी. पाटील यांनी विद्यार्थ्यांनी अपूर्व असे यश संपादन करून

निर्माण केलेली परंपरा आजतागायत चालू आहे. हेलिसंकी येथे झालेल्या जागतिक सामन्यात मल्लविवेत अभूतपूर्व यश संपादन करणारे एकमेव भारतीष श्री. खाशाबा जाधव हे याच संस्थेतील विद्यार्थी आहेत. तसेंच विश्वविद्यालयीन सामन्यांतील कुस्तीत ऑजिलयपद मिळविणारे गुंगा पाटीलहि याच संस्थेतील विद्यार्थी आहेत.

**संस्थेचे पदाधिकारी :**

श्री शाहू मराठा विद्यार्थी वसतिगृहाच्या संस्थेच्या संस्थापक संचालकांच्या मध्ये प्रथम पासून राजर्षी शाहू महाराजांचे जनकबंधू श्रीमंत बापूसाहेब पिराजीराव घाडगे यांचा बहुमोलाचा वाटा होता. त्यांनी व्यक्तिशः वसतिगृहाच्या स्थापनेपासून पुढे अनेक वर्ष ते स्वतः जातीनिशी वसतिगृहाच्या प्रशासनामध्ये लक्ष घालत असत. संस्थेचे जे संस्थापक-संचालक होती यामध्ये श्रीमंत बापूसाहेब पिराजीराव घाडगे, श्री. आप्पासाहेब शिंदे म्हैसाळकर, श्री. मामासाहेब खानविलकर, श्री. शंकरराव शिंदे-म्हैसाळकर, रावसाहेब आर. पी. सावंत, डॉ. आर. के. शिरोडकर, रावसाहेब एस. एस. भोसले, डी. आर. भोसले, डी. वाय. भोसले ऊर्फ मामासाहेब मिंचेकर इत्यादींचा यामध्ये समावेश होता.

संस्थेच्या स्थापणेपासून कोल्हापूर संस्थांचे छत्रपती हे पदसिद्ध अध्यक्ष आहेत. मात्र संस्था प्रारंभी श्रीमंत दत्ताजीराव बाळासाहेब उर्फ श्रीमंत दत्ताजीराव बाळासाहेब उर्फ काकासाहेब घाडगे, श्रीमंत पिराजीराव बापूसाहेब घाडगे, श्रीमंत युवराज राजाराम महाराज, श्रीमंत राजाराम छत्रपती महाराज, पुण्यशील मातोश्री श्री ताराबाई छत्रपती महाराणी साहेब, श्री शहाजी छत्रपती महाराज आणि सध्या विद्यमान पेट्रन-इन-चीफ तथा अध्यक्ष श्रीमंत शाहू महाराज कार्यरत आहेत.

संस्थेच्या वेळी उपाध्यक्ष म्हणून श्रीमंत पिराजीराव बापूसाहेब घाडगे काम पाहत असत. त्यानंतर श्रीमंत प्रिन्स शिवाजी महाराज, श्रीमंत जयसिंगराव घोरपडे, श्रीमंत आबासाहेब घाडगे, श्रीमंत क्षात्र जगतगुरु, रावबहादूर डॉ. पी. सी. पाटील, श्रीमंत जयसिंगराव घाटगे, रावबहादूर आर. वाय. चव्हाण आणि देवचंदजी शहा यांनी संस्थेचे उपाध्यक्ष म्हणून कार्य केलेले आहे.

सन १९५२ नंतर संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे चेअरमन म्हणून अनेक दिग्गज मान्यवारांनी कार्य करून संस्थेचा नाव लौकिक वाढवला आहे. यामध्ये रावबहादूर डी. एस. भोसले, रावबहादूर डॉ. पी. सी. पाटील, कै. सर्जेराव कृष्णराव माने, कै. बाळासाहेब पाटील-कौलवकर, कै. पी. डी. पाटील आणि कै. श्रीपतराव बोंद्रे (दादा), कै. महिपतराव बोंद्रे (पापा) इत्यादींचा समावेश होतो. सध्या संस्थेचे विद्यमान चेअरमन श्री मानसिंगदादा बोंद्रे हे कुशलपूर्वक संस्थेचे नेतृत्व करत आहेत

सन १९०१ ते १९१७ पर्यन्त श्री. दाजीसाहेब विचारे व भास्करराव जाधव हे संस्थेचे ऑनररी सेक्रेटरी म्हणून काम पाहात होते. त्यानंतर सन १९१७ ते १९२५ पर्यन्त रावबहादूर शंकराव इंदुलकर हे ऑनररी सेक्रेटरी म्हणून कार्यरत होते. सन १९२६ मध्ये छत्रपती राजाराम महाराजांनी श्री शाहू मराठा विद्यार्थी वसतिगृहासाठी नवीन कार्यकारी मंडळाची नियुक्ती केली. आणि संस्थेचे ऑनररी सेक्रेटरी म्हणून संस्थेचे माजी विद्यार्थी रावबहादुर आर. पी. सावंत यांची नियुक्ती केली. सन १९२६ ते १९५० या दीर्घ कालखंडात त्यांनी मोठ्या कुशलतेने संस्थेचे कार्य केले. श्री. सावंत हे कोल्हापूरची संस्थानचे चीफ जस्टिस होते. सन १९५० नंतर संस्थेचे मानद सचिव म्हणून श्री एस. एस. भोसले, श्री रंगराव हरी चौगुले, कै. बाळासाहेब पाटील-कौलवकर, कै. सर्जेराव पाटील, मा. नामदेवराव कांबळे, कै. चंद्रकांत बोंद्रे (दादा) यांनी कार्य केलेले आहे, सध्या विद्यमान मानद सचिव श्री विजयबापू बोंद्रे हे अतिशय कुशलपूर्वक संस्थेचे नेतृत्व करत आहेत

**संस्थेच्या कार्याचा शैक्षणिक विस्तार :**

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचा स्थापनेच्या वेळी ग्रामीण भागातील बहुजन समाजातील होतकरू व गरीब विद्यार्थ्यांच्या राहण्या-जेवणाची सोय करणे अर्थात वसतिगृह चालीवणे हे होते. मात्र सन १९६७ नंतर संस्थेने आपले कार्य वसतिगृहापुरते न ठेवता शैक्षणिक संकुल उभे करण्याच्या कार्याला सुरवात केलेली दिसते. संस्थेच्या शैक्षणिक कार्य विस्तारासंबंधी संस्थेचे माजी चेअरमन कै. बाळासाहेब पाटील-कौलवकर, कै. पी. डी. पाटील आणि कै. श्रीपतराव बोंद्रे (दादा) यांच्या बरोबर संस्थेचे तत्कालीन मानद सचिव राहिलेले कै. सर्जेराव पाटील, मा. नामदेवराव कांबळे, कै. चंद्रकांत बोंद्रे (दादा) यांचे योगदान महत्वाचे आहे. कै. श्रीपतराव बोंद्रे (दादा)

यांच्या कार्यकाळात संस्थेने अनेक विभाग सुरू करून आपला नावलौकिक वाढवला आहे. संस्थेच्या शैक्षणिक कार्यास सदैव प्रेरणा आणि मार्गदर्शन करणारे संस्थेचे तत्कालीन पेट्रन-इन-चीफ तथा अध्यक्ष श्रीमंत श्री शहाजी छत्रपती महाराज, विद्यमान पेट्रन-इन-चीफ तथा अध्यक्ष श्रीमंत शाहू महाराज यांचे योगदान महत्वाचे आहे..

**जवाहरनगर हायस्कूल :**

१२ ऑगस्ट १९५९ जवाहरनगर को. ऑप. हौसिंग सोसायटी, जवाहरनगर, कोल्हापूर या संस्थेच्या इमारतीचा कोनशिला समारंभ दि. १२ ऑक्टोबर १९५९ रोजी अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्षा स्व. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. सदर इमारतीत १९६२ साली स्थानिक वीर ककैय्या समाजाच्या मंडळाने जवाहरनगर हायस्कूलची सुरुवात केली. सन १९६८ पर्यंत त्यांच्या देखरेखीखाली हायस्कूल सुरु होते. दि. ७ ऑगस्ट १९६८ रोजी कै. श्रीपतराव बोंद्रे (दादा) यांच्या नेतृत्वाखाली श्री शाहू छ. शिक्षण संस्था, दसरा चौक, कोल्हापूर यांचेकडे हस्तांतरित करणेत आले.

**राधानगरी हायस्कूल, राधानगरी:**

राधानगरी या मागासलेल्या डोंगराळ भागात असणारी राधानगरी विद्यालय (हायस्कूल) ही संस्था सन १९६८ मध्ये संस्थेने चालविण्यास घेतली होती.१मार्च १९८५ मध्ये हे हायस्कूल राधानगरी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, राधानगरी यांनी चालविण्यास मिळण्यासाठी केलेल्या अर्जानुसार त्यांच्याकडे देण्यात आले. हे हायस्कूल कोल्हापूरपासून थोडे दूर असल्याने त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सदर हायस्कूल राधानगरी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाकडे हस्तांतरित करण्यात आले.

**श्री साई हायस्कूल व जुनियर कॉलेज :**

श्री साई हायस्कूलची स्थापना १ जून १९६० रोजी झाली. श्री साई शिक्षण संस्थेतर्फे हे चालवले जात असे. १ एप्रिल १९७० रोजी श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेकडे हस्तांतर करण्यात आले आहे. सन २०१२-१३ मध्ये श्री साई हायस्कूलकडे विज्ञान विभाग सुरू करण्यात आला आहे.

**शंकरराव बोंद्रे बालमंदिर :**

सन १९६८ संस्थेच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी के. जी. ते पी. जी. (पोस्ट ग्रॅज्युएट) अभ्यासक्रम सुरु केले. मर्दानी खेळाचा आखाडा, शिवाजी पेठ, कोल्हापूर यांचेतर्फे कै. श्रीपतरावजी बोंद्रे दादा यांनी आपल्या परिसरातील गोरगरीब मुलांच्यासाठी २/- रु. फीवर एक शिक्षिका व एक दाई यावर बालमंदिर सुरु करण्यात आले.

**श्री शाहू छत्रपती आयटीआय :**

दि. १३ जुलै १९८३ रोजी गरजू व गरीब विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षण व कौशल्या उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने संस्थेने श्री शाहू छत्रपती औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू केली.

संस्थेच्या माध्यमातून वेणूताई यशवंतराव चव्हाण होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल ३० सप्टेंबर १९८४ रोजी सुरू करण्यात आले. याशिवाय संस्थेच्या माध्यमातून वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय (१९८९), सावित्रीबाई फुले महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय (१९९०) राजर्षि राजश्री शाहू छत्रपती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी या कॉलेजची स्थापना ४ फेब्रुवारी १९९१ रोजी केलेली आहे. दि. १८ मे २००० रोजी इंग्रजी शिक्षणाची गरज ओळखून श्रीपतराव बोंद्रे इंग्लिश मीडियम हायस्कूल सुरू केलेले आहे.